# ई - पोलीस पत्रिका

दि.३०/०९/२०२४ अनु.क्र.१७७

## (अमरावती शहर पोलीसांची२०२४ ची उद्दिष्टे)

- नागरिकांशी मित्रत्वाचे संबध.
- उच्च मनोबल युक्त व तणाव मुक्त पोलीस दल.
- महिला, मुले व ज्येष्ठ नागरिकांची सुरक्षा.
- जातीय सलोखा वाढविणे.
- संघटित गुन्हेगारी आणि आतंकवादी यांचे विरूद्ध कठोर कारवाई.
- रस्त्यावरील गुन्हेगारीवर नियंत्रण/सुरक्षा.
- पोलीस कोठडीत गुन्हे घडू नदेणे.
- आरोपी पोलीसांचेताब्यातून पळून जाऊ नयेत.
- “सुरक्षित व सुखकर अमरावती” हा आमचा संकल्प आम्ही व्यापक लोकसहभागातून साध्य करू.

## भाग-१

## पदोन्नती/बदली/प्रशिक्षण/रजा

## बदली

**१.पोआअ/पशा-१/बिनतारी संदेश/पदोन्नती कार्यमुक्त/८५३३/२०२४ अमरावती शहर दिनांक २०/०९/२०२४**

**संदर्भ :-** १.मा.अपर पोलीस महासंचालक व संचालक पोलीस दळणवळण व परिवहन म.रा.पुणे यांचे आदेश क्र.आस्था-२/ई-८/सहा.पोलीस उपनिरीक्षक (रेयां)/ प्रशासकीय बदल्या /२०२३/२१०५/२०२३ दि.०२/०६/२०२३

२.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण नागपुर मुळ अर्ज क्र.८५३/२०२३ दि.०२/०६/२०२३

३.पोलीस अधीक्षक,पोलीस दळणवळण व माहिती तंत्रज्ञाने,नागपुर यांचे पत्र क्र.ईई/रेयां सोनटक्के/स.सा.बदल्या -२०२३ / कार्यमुक्त / १४५४ /२०२३ दि.२३/०९/२०२४

### आदेश

**सपोउपनि/रेडीओ यांत्रीकी, सुधिर पांडुरंग सोनटक्के** नेमणूक बिनतारी संदेश विभाग, अमरावती शहर यांची मा.अपर पोलीस महासंचालक व संचालक, दळणवळण व परिवहन, महाराष्ट्र राज्य, पुणे यांचे संदर्भीय आदेशान्वये पोलीस अधीक्षक,वाशिम यांचे आस्थापनेवर प्रशासकीय कारणास्तव बदली करण्यात आली आहे. तथापि सपोउपनि/रेडीओ यांत्रीकी,सुधिर पांडुरंगसोनटक्के यांनी वाशिम येथे झालेली बदली रद्य होणेबाबत मा.महाराष्ट्र प्रशासकीय न्यायाधिकरण नागपुर येथे मुळ अर्ज क्र.८५३/२०२३ दाखलकेलाहोता. त्याअनुषंगाने मा.न्यायालयाने मुळ अर्ज क्र.८५३/२०२३ खारीज केला आहे.

त्यानुसार पोलीस अधीक्षक, दळणवळण व माहिती तंत्रज्ञान ,नागपुर यांनीसपोउपनि/रेडीओ यांत्रीकी,सुधिर पांडुरंगसोनटक्के यांना बदलीचे ठिकाणीतात्काळकार्यमुक्त करणेबाबत या कार्यालयास कळविले आहे. त्याअनुषंगानेसपोउपनि/रेडीओ यांत्रीकी,सुधिर पांडुरंगसोनटक्के यांना बदलीचे ठिकाणी पोलीस अधीक्षक, वाशिम यांचे आस्थापनेवर हजर होणे करीता दिनांक २५.०९.२०२४ चे मा.नंतर कार्यमुक्त करण्यात येत आहे.

## प्रशिक्षण

**१.पोआअ/पशा-१/प्रशिक्षण/महीला संरक्षण/८३३९/२०२४ अमरावती शहर दिनांक १८/०९/२०२४**

**संदर्भ :-** जिल्हा महिला व बालविकास अधिकारी, अमरावती यांचे पत्र जा.क्र. जि मव वबाअ/ अम/म. वि /१८२९/२०२५ दि. १३.०९.२०२४

**विषय :-** कौटुंबिक हिंसाचारापासुन महिलांचेसंरक्षण अधिनियम २००५ या अअधिनियमाच्या

प्रभावी अंमलबजावणी करण्यासाठी कार्यशाळेस उपस्थित राहण्याबाबत.

## आदेश

उपरोक्त संदर्भीय विषयान्वये राज्यातील महिलांचेसुरक्षासंरक्षण व पुनर्वसनासाठी राबविण्यात येत असलेल्या विविध योजना अधिनियमातील तरतुदी इत्यादी बाबींची व कौटुंबिक हिंसाचार अधिनियम २००५ या अधिनियमाच्या प्रभावीपणे अंमलबजावणी होण्यासाठी महिला व बालविकास विभाग आणि कोरो इंडिया मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने दिनांक २०.०९.२०२४ रोजी नाशिक येथील महाराष्ट्र पर्यावरण अभियांत्रिकी प्रशिक्षण व संशोधन संस्था (मित्रा), नाशिक महसुलकार्यालयासमोर नाशिक येथे कार्यशाळा आयोजित करण्यात आलेली आहे. सदर कार्यशाळे करीता या घटकातुन एक प्रतिनिधी पाठविणे बाबत कळविले आहे.

त्याअनुषंगाने पोलीस आयुक्त, अमरावती शहर या घटकातुन खालिल पोलीस अधिकारी यांची सदर कार्यशाळे करीता प्रतिनिधी म्हणुन निवड करण्यात येत आहे.

| अ. क्र. | अधिका-याचे नांव | पदनाम | पोलीस घटकाचे नांव | सद्याची नेमणुक | मोबाईल क्र. |
|---|---|---|---|---|---|
| ०१ | श्रीमती दिप्ती ब्राम्हणे | पोलीस निरीक्षक | पोलीस आयुक्त, अमरावती शहर | भरोसा सेल | 9823479980 |

**प्रशिक्षण केंद्रात जाण्यापुर्वी त्या बाबतचे नियम व अटी खालील प्रमाणे :-**

१. पोलीस अधिकारी यांनी दि.१९.०९.२०२४ रोजी १८.०० वाजे पर्यंत प्रशिक्षणस्थळी हजर रहावे. निवास व्यवस्था निश्चित करण्यासाठीश्री. अनिल भोये, जिल्हा परिविक्षा अधिकारी, विभागीय उप आयुक्त महिला व बाल विकास कार्यालय, नाशिक विभाग, नाशिक मो. क्र.९४२२६२१९८६ ( Email ID- division.nasik@rediffmail.com) यांचेशी संपर्क साधावा.

## भाग-२

## शिक्षा/निलंबन/पुन्हा स्थापना/बक्षिस/सेवानिवृत्त/मयत/नाव कमीकरण

## निरंक

## भाग-३

## वेतन/संरचना/वेतन निश्चिती/वार्षीक वेतनवाढ/संकीर्ण

## संकीर्ण

**०१.पोआअ/प्रलि-आस्था/नप्रपोशि-चव्हाण/८३४८/२०२४ अमरावती शहर दिनांक १३/०९/२०२४**

## आदेश

या कार्यालयाचे आदेशक्रमांक पोआअश/प्रलि-आस्था/पोलीस भरती/२०२४,७४५७ दिनांक २०.८.२०२४ अन्वये नप्रपोशि/१२७५ श्री.आदित्य नंदकिशोर चव्हाण यांना पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. तथापि सदर नप्रपोशि हे  मध्यवर्ती कारागृह, अमरावती येथेकारागृह शिपाई पदावर कार्यरत असल्याने व त्यांना कार्यमुक्त न केल्यानेते वेळीच हजर झाले नाही.

अधीक्षक, मध्यवर्ती कारागृह अमरावती यांनीत्यांचे पत्र क्रमांक आस्थापना विभाग/कार्यमुक्त अहवाल/६४०१/२०२४ दिनांक १३.९.२०२४ अन्वये नप्रपोशि/१२७५ श्री.आदित्य नंदकिशोर चव्हाण यांना दिनांक १३.९.२०२४ रोजी म.नं. पोलीस शिपाई पदावर हजरहोण्याकरीताकार्यमुक्तकेले आहे.तसेचत्यांची मा. कारागृह उपमहानिरीक्षक, मध्य विभाग छत्रपती संभाजी नगर यांचे दिनांक ८.२.२०२४ चे आदेशान्वये देय वेतनवाढ दोन वर्षाकरीता (अपरिणामकारक) रोखण्यात आलीहोती, त्यानुसारसदर नप्रपोशि यांनी वेतनवाढ रोखण्याच्या शिक्षेची रक्कम रु.४३२००/- जी.ई.एन.पावती क्रमांक ७५९०४०१ दिनांक १३.९.२०२४ अन्वये एक रक्कमी भरणा केली आहे.

तसेच नप्रपोशि/१२७५ श्री.आदित्य नंदकिशोर चव्हाण यांचे राजपुत/ईडब्ल्युएस चे प्रमाणपत्र तहसिलदार खामगाव जि.बुलडाणा यांचेकडे पडताळणीकरीता पाठविण्यात आले असता तहसिलदार खामगाव यांनीत्यांचे पत्र क्रमांक कावि/सेतुलिपीक/२१४/२०२४, दिनांक २.९.२०२४ अन्वये  सदर उमेदवार यांनीसादरकेलेले सर्व कागदपत्रामध्ये राजपुत या जातीचा उल्लेख असल्याने व राजपुतही जात कोणत्याही प्रवर्गात मोडत नसल्याने राजपुत/ईडब्ल्युएस प्रमाणपत्र निर्गमित करण्यात आले असल्याबाबत कळविले आहे. तसेचसदर नप्रपोशि यांनी यापुढे EWS चे प्रमाणपत्र खोटे आढळल्यास पोलीस शिपाई पदावर झ ालेली निवड रद्य होईल व माझी निवड रद्य झाल्यास त्याबाबत कोणताही आक्षेप राहणार नाही याबाबत प्रतिज्ञालेखसादरकेला आहे.

नप्रपोशि/१२७५ श्री.आदित्य नंदकिशोर चव्हाण हे दिनांक १७.९.२०२४ रोजी कर्तव्यावर हजरहोण्याकरीता आले असुनसदर नप्रपोशि नियुक्ती दिल्याचेतारखेपासुन ३० दिवसाचे आत हजर झालेले असल्यानेमहाराष्ट्र नागरी सेवा (ज्येष्ठतेचे विनियमन)नियमावली १९८२,मधील नियम ४(२)(अ) तरतुदीनुसार त्यांना पोलीसशिपाई पदी दिनांक १७.९.२०२४ रोजी मा.पुर्वी पासुन कर्तव्यावर हजर करुन घेण्यात येत आहे. तसेच महाराष्ट्र नागरी सेवा(निवृत्तीवेतन) नियम १९८२ मधील नियम ४६ (२)

तरतुदीनुसार त्यांची मध्यवर्ती कारागृह येथील सेवा निवृत्ती वेतनाकरीता ग्राहय राहील.तसेच पुर्वीचे शासकीय नोकरीचा सेवाज्येष्ठतेमध्येकोणताही लाभ त्यांना मिळणार नाही, याची जाणीव करुन देण्यात येत आहे.

**०२.पोआअ/प्रलि-आस्था/नप्रपोशि-केवट/८५७१/२०२४अमरावती शहर दिनांक २५/०९/२०२४**

## आदेश

या कार्यालयाचे आदेशक्रमांक पोआअश/प्रलि-आस्था/पोलीस भरती/२०२४/७४५७ दिनांक २०.८.२०२४ अन्वये नप्रपोशि/१४०५ धिरज अशोकराव केवट यांना पोलीस शिपाई पदावर नियुक्ती देण्यात आली आहे. तथापि सदर नप्रपोशि त्यांच्या वैयक्तीक कारणास्तव वेळीच हजर झाले नाही.

नप्रपोशि/१४०५ धिरज अशोकराव केवटहे दिनांक २४.९.२०२४ रोजी कर्तव्यावर हजर होण्याकरीता आले असुन सदर नप्रपोशि नियुक्ती दिल्याचे तारखे पासुन विहीत कालावधीत हजर झाले आहेत. तरी सदर नवप्रविष्ठ पोलीस शिपाई यांना कर्तव्यावर हजर करुन घेवुन तसा अनुपालन अहवाल या कार्यालयास सादर करावा.

**(कल्पना बारवकर)**
पोलीस उपायुक्त (मुख्या.)
अमरावती शहर

प्रति,

पत्रव्यहार शाखा/सेवापट नोंदणी लिपीक/सीसीटीएनएस